RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३१ (२)] सोमवार, ऑगस्ट २२, २०१६/श्रावण ३१, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.—**महाराष्ट्र महामार्ग अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . | १–८ |

दिनांक २२ ऑगस्ट २०१६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २२ ऑगस्ट २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र महामार्ग अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९५५ चा ५५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०१६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये,– १९५५ चा ५५.

(क) खंड (ड) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

" (ड-१) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, महसुली जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, असा आहे आणि त्यामध्ये, जमीन एकत्रीकरण योजनेच्या प्रयोजनासाठी, शासनाने नियुक्त केलेला, उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल असा कोणताही अधिकारी, याचा समावेश होतो ; " ;

(ख) खंड (के) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

" (के-१) " जमीन एकत्रीकरण योजना " किंवा " योजना " याचा अर्थ, महामार्गाचे बांधकाम व नवीन नगराचा विकास करण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनांकरिता, महामार्गाच्या सीमेत व नवीन नगराच्या जागेत येणाऱ्या विभिन्न मालकी हक्कांखालील जमिनीचे ऐच्छिक एकत्रीकरण करून, त्या बदल्यात शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या जमीन एकत्रीकरण योजनेनुसार निर्धारित केलेल्या क्षेत्रफळा एवढ्या विकसित अकृषिक भूखंडाचे किंवा जमिनीचे हक्क प्रदान करणे, असा आहे ; " ;

(ग) खंड (म) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

" (म-१) " नवीन नगर " याचा अर्थ, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३ अन्वये **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नवीन नगर म्हणून घोषित केलेले किंवा घोषित करावयाचे क्षेत्र, असा आहे ; ". १९६६ चा महा. ३७.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून विकसित करावयाच्या किंवा बांधकाम, परिरक्षण, विकास किंवा सुधारणा यांसाठी हस्तांतरित, अभिहस्तांकित, सुपूर्द करावयाच्या, कलम ३ अन्वये अधिसूचित केलेल्या कोणत्याही महामार्गाच्या किंवा महामार्गांच्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे, त्या महामार्गासाठी किंवा महामार्गांसाठी महामार्ग प्राधिकरण असेल. " .

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, " ते सुधारण्याचे काम " या मजकुरानंतर " आणि नवीन नगराचे विकासकाम " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये, खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

" (ग-१) नवीन नगराचे सीमांकन करता येईल आणि जमीन एकत्रीकरण योजनेत समाविष्ट असलेल्या जमिनीच्या अंतिम आराखड्यामधील रस्ते व भूखंड यांच्या सीमांचे दगड आणि खुणा ठेवून सीमांकन करता येईल ; " .

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ यामध्ये प्रकरण तीन-अ समाविष्ट करणे.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ई नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :—

" प्रकरण तीन-अ

**जमीन एकत्रीकरण योजना**

योजनेकरिता क्षेत्र निश्चिती.

**१९फ.** (१) महामार्ग प्राधिकरण हे, जमीन एकत्रीकरण योजनेच्या प्रयोजनासाठी प्राधिकरण असेल.

(२) महामार्ग प्राधिकरणास, एकतर स्वतःहून किंवा जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून आलेल्या अर्जांच्या आधारे, योजनेचे क्षेत्र निश्चित करता येईल.

(३) महामार्ग प्राधिकरण निश्चित केलेल्या क्षेत्रांत योजना लागू करील.

(४) महामार्ग प्राधिकारण, योजनेत समाविष्ट असलेले क्षेत्र आणि त्याच्या सीमा यांचे रेखांकन असलेला प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याला विहित रितीने सादर करील.

योजनेचा उद्देश घोषित करणे व अंतिम अधिसूचना काढणे.

**१९ग.** (१) सक्षम प्राधिकारी, कलम १९फ च्या पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे महामार्ग प्राधिकरणाकडून आलेल्या प्रस्तावाच्या संबंधात योजना तयार करण्याचा आपला उद्देश घोषित करणारी, त्या योजनेत ज्यांच्या जमिनी समाविष्ट केलेल्या असतील अशा जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून, विहित रितीने आणि विहित कालावधीच्या आत योजनेबद्दलच्या हरकती किंवा सूचना तसेच योजनेतील ऐच्छिक सहभागाबाबत संमती मागविणारी प्रारंभिक अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करील.

(२) जमीन मालक किंवा हितसंबंधित व्यक्ती, योजनेबाबतच्या आपल्या हरकती किंवा सूचना तसेच संमती, लेखी स्वरूपात, **राजपत्रात** प्रारंभिक अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून विहित कालावधीच्या आत, विहित रितीने, सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करतील किंवा अशा प्राधिकाऱ्यासमोर हजर होतील.

(३) सक्षम प्राधिकारी, अशा सर्व हरकती किंवा सूचना विचारात घेतल्यानंतर किंवा, यथास्थिति, म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, आणि त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही चौकशी केल्यानंतर, हरकती किंवा सूचनांवरील त्याच्या शिफारशी अंतर्भूत असलेल्या अहवालासह त्याने केलेल्या कार्यवाहीच्या नोंदीची एक प्रत, महामार्ग प्राधिकरणाकडे पाठवील.

(४) महामार्ग प्राधिकरण, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अभिलेख व अहवाल यांवर विचार करील आणि योजनेत समाविष्ट असलेले क्षेत्र आणि त्याच्या सीमा यांचे रेखांकन असलेली अंतिम अधिसूचना, आवश्यकता भासल्यास, त्यास योग्य वाटतील अशा फेरबदलांसह किंवा फेरबदलांविना विहित रितीने प्रसिद्ध करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा महामार्ग प्राधिकरणाचा निर्णय हा अंतिम व निर्णायक असेल.

(६) पोट-कलम (२) अन्वये जमीन मालकांनी किंवा हितसंबंधित व्यक्तींनी एकदा दिलेली संमती मागे घेता येणार नाही.

जमिनीच्या मालकी हक्काची व संमतीच्या व्याप्तीची पडताळणी.

**१९ह.** (१) सक्षम प्राधिकारी, योजनेत समाविष्ट केलेल्या जमिनीचे महसुली अभिलेख, नोंदणी दस्तऐवज आणि तिच्या मालकी संबंधीचे इतर संबद्ध दस्तऐवज यासंदर्भातील त्या जमिनीच्या मालकी हक्काची, आणि कलम १९ग च्या पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे संमतीच्या व्याप्तीची विहित रितीने, विहित कालावधीच्या आत पडताळणी करील.

(२) सक्षम प्राधिकारी, योजनेकरीता जमिनीच्या स्वीकृतीस पृष्टी देणारा किंवा अन्यथा समुचित आदेश, आपल्या मोहोरेनिशी व सहीनिशी काढील.

वादग्रस्त मालकी हक्क.

**१९आय.** (१) योजनेखालील ज्या क्षेत्राच्या संबंधात उद्देश घोषित केलेला आहे त्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीच्या मालकीहक्काच्या दाव्याबाबत कोणताही विवाद असेल त्या बाबतीत किंवा अशा विवादित दाव्याशी संबंधित हक्क किंवा नोंद बदलाची अभिलेखातील कोणतीही नोंद चुकीची किंवा अनिर्णायक असेल, अशा प्रकरणात, सक्षम प्राधिकाऱ्यास विकसित अकृषिक भूखंडाचे किंवा जमिनीचे अंतिम वाटप करण्यापूर्वी कोणत्याही वेळी विहित रीतीने चौकशी करता येईल.

(२) सक्षम प्राधिकारी, जमीन मालकाला किंवा हितसंबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, योजनेच्या प्रयोजनांसाठी त्या जमिनीचा मालक किंवा हितसंबंधित व्यक्ती कोण आहे याचा निर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी, आपल्या मोहोरेनिशी व सहीनिशी समुचित आदेश काढील.

(३) व्यथित झालेल्या व्यक्तीस, लागू असलेल्या कायद्याप्रमाणे सक्षम महसूल प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करता येईल, किंवा, यथास्थिति, सक्षम अधिकारिता असणाऱ्या न्यायालयात रीतसर दावा दाखल करता येईल.

योजनेत सहभागी न होणाऱ्या जमीन मालकांच्या जमिनीचे संपादन करणे.

**१९जे.** जे जमीन मालक किंवा हितसंबंधित व्यक्ती योजनेत स्वेच्छेने सहभागी झालेले नसतील अशा जमीन मालकांची किंवा हितसंबंधित व्यक्तींची जमीन ही, जमीन संपादनासाठी लागू असलेल्या कायद्यानुसार संपादित करण्यात येईल.

प्रारूप व अंतिम आराखडा प्रसिद्ध करणे.

**१९के.** (१) महामार्ग प्राधिकरण, नवीन नगराच्या सीमांमध्ये अंतर्भूत असलेल्या जमिनीचा प्रारूप आराखडा विहित रितीने तयार करील. प्रारूप आराखड्यामध्ये सर्व जमिनीचा अंतर्भाव असेल—मग ते जमीन मालक किंवा हितसंबंधीत व्यक्ती या योजनेत स्वेच्छेने सहभागी झालेल्या असोत किंवा नसोत.

(२) महामार्ग प्राधिकरण, योजनेत स्वेच्छेने सहभागी झालेले आहेत अशा जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधीत व्यक्तींकडून हरकती किंवा सूचना मागविण्यासाठी, विहित केलेल्या रितीने अशा जमिनीच्या संबंधातील प्रारूप आराखडा प्रसिद्ध करील.

(३) जमीन मालक किंवा हितसंबंधीत व्यक्ती, प्रारूप आराखडा प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून विहित कालावधीत, महामार्ग प्राधिकरणाकडे विहित रितीने लेखी स्वरूपात किंवा अशा प्राधिकरणासमोर उपस्थित राहून, प्रारूप आराखड्याबद्दलच्या आपल्या हरकती किंवा सूचना सादर करतील.

(४) महामार्ग प्राधिकरण अशा सर्व हरकती किंवा सूचना ऐकून घेईल, त्याबाबतचे अभिलेख विचारात घेईल आणि त्यास योग्य वाटतील अशा कोणत्याही फेरबदलांसह, कोणतेही असल्यास, अंतिम आराखडा प्रसिद्ध करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये, अंतिम आराखडा प्रसिद्ध करण्याबाबतचा महामार्ग प्राधिकरणाचा निर्णय हा अंतिम व निर्णायक असेल.

महामार्ग प्राधिकरणाकडे जमीन निहित होणे.

**१९ल.** (१) कलम १९ग च्या पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे योजनेखालील अंतिम अधिसूचित क्षेत्रामधील जमीन आणि कलम १९के च्या पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अंतिम आराखड्यातील जमीन, योजनेच्या विकास व अंमलबजावणीकरिता भोगवटादार वर्ग-एकच्या तत्त्वावर, सर्व भारांपासून मुक्त अकृषिक जमीन म्हणून संपूर्णपणे, महामार्ग प्राधिकरणाकडे निहित होईल :

परंतु, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, भोगवटादार वर्ग-दोन म्हणून धारण केलेली कोणतीही जमीन योजनेखाली महामार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याकरिता शासन कोणतेही अधिमूल्य किंवा नजराणा किंवा अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा आकारणार नाही, आणि असे हस्तांतरण झाल्यावर, अशी जमीन, भोगवटादार वर्ग-एकच्या तत्त्वावर सर्व भारांपासून मुक्त होऊन, अकृषिक जमीन म्हणून, महामार्ग प्राधिकरणाकडे निहित होईल.

(२) कोणतीही व्यक्ती, महामार्ग प्राधिकरणाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीचा अनाधिकृतपणे भोगवटा करत आहे असे, महामार्ग प्राधिकरणास, वाटत असेल तर, त्या व्यक्तीला, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये तरतूद केलेल्या रितीने, जिल्हाधिकाऱ्याकडून संक्षिप्त न्यायचौकशी करून निष्कासित करता येईल. १९६६ चा महा. ४१.

विकसित अकृषिक भूखंडाचे किंवा जमिनीचे वाटप.

**१९म.** (१) महामार्ग प्राधिकरण, शासनाने घोषित केलेल्या योजनेनुसार, योजनेमध्ये स्वेच्छेने सहभागी झालेले असतील अशा जमीन मालकांस किंवा हितसंबंधीत व्यक्तीस, विकसित अकृषिक भूखंडाचे किंवा जमिनीचे वाटप करील.

(२) विकसित अकृषिक भूखंड किंवा जमीन वाटपाची प्रक्रिया, विहित रितीने करण्यात येईल.

जमीन एकत्रीकरण मालकी प्रमाणपत्र.

**१९न.** (१) महामार्ग प्राधिकरण, कलम १९म मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विकसित अकृषिक भूखंडाचे किंवा जमिनीचे जमीन मालकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना वाटप केल्यानंतर, विहित कालावधीत, जमीन एकत्रीकरण मालकी प्रमाणपत्र (यात यापुढे ज्याचा निर्देश " प्रमाणपत्र " असा केला आहे) देईल :

परंतु, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, विकसित अकृषिक भूखंडाची किंवा जमिनीची मालकी भोगवटादार वर्ग-एकच्या तत्वावर सर्व भारांपासून मुक्त असेल.

(२) प्रमाणपत्रात, जमीन मालकांच्या किंवा हितसंबंधीत असणाऱ्या व्यक्तींच्या मूळ जमिनीचा तपशील, विकसित अकृषिक भूखंडाचा किंवा जमिनीचा तपशील तसेच तिच्या मूळ मालकीबाबतचा तपशील, त्याचबरोबर विकसित अकृषिक भूखंडाचा किंवा जमिनीचा नकाशा, यांचा समावेश असेल.

१९०८ चा १६. (३) महामार्ग प्राधिकरण, नोंदणी अधिनियम, १९०८ च्या तरतुदींन्वये प्रमाणपत्राची नोंदणी करील. असे प्रमाणपत्र हे, वाटप केलेल्या विकसित अकृषिक भूखंडाच्या किंवा जमिनीच्या बाबतीत मालमत्तेवरील मालकी हक्काचा निर्णायक पुरावा असेल आणि ते संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ च्या तरतुदींनुसार मालमत्तेच्या मालकी हक्काच्या हस्तांतरणाकरिता पात्र असेल. १८८२ चा ४.

**१९ओ.** (१) कलम १९न च्या पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, प्रमाणपत्राची नोंदणी करण्याकरिता महामार्ग प्राधिकरणाकडून कोणतीही नोंदणी फी आणि मुद्रांक शुल्क आकारण्यात येणार नाही. नोंदणी फी, मुद्रांक शुल्क, इत्यादींच्या प्रदानामधून सूट.

(२) महामार्ग प्राधिकरणाने कलम १९म च्या पोट-कलम (१) अन्वये वाटप केलेल्या पहिल्या धारकाकडून विकसित अकृषिक भूखंडावर किंवा जमिनीवर कोणतीही अकृषिक आकारणी करता येणार नाही.

**१९प.** (१) सक्षम प्राधिकारी, कलम १९न च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, ज्यांना प्रमाणपत्र देण्यात आले असेल अशा जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून, योजनेतील जमिनीचा कब्जा घेईल आणि अशा जमिनीचा कब्जा विहित रीतीने महामार्ग प्राधिकरणाकडे देईल. जमिनीचा कब्जा घेण्याचा अधिकार.

(२) सक्षम प्राधिकारी, जमीन संपादन करण्यासाठी लागू असलेल्या कायद्यानुसार संबंधित जमीन मालकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना भरपाईच्या रकमेचे संपूर्ण प्रदान करण्यात आले असल्याची तसेच, त्यांना पुनर्वसन व पुनर्वसाहत हक्कदारी देण्यात आली असल्याची सुनिश्चिती केल्यानंतर, कलम १९जे मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, संपादित जमिनीचा कब्जा घेईल. त्यानंतर, सक्षम प्राधिकारी अशा जमिनीचा कब्जा विहित रीतीने महामार्ग प्राधिकरणाकडे देईल.

**१९क्यू.** (१) नियोजन प्राधिकरण, कलम १९ग च्या पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे योजनेच्या अंतिम अधिसूचित क्षेत्रातील जमिनीचा आणि कलम १९के च्या पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अंतिम आराखड्यातील जमिनीचा, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये नवीन नगराच्या विकास योजनेमध्ये समावेश करील. जमिनीचा विकास योजनेत अंतर्भाव करणे. १९६६ चा महा. ३७.

**१९र.** विकसित अकृषिक भूखंडाचा किंवा जमिनीचा मालक पुढील बाबींकरिता जबाबदार असेल म्हणजे :— विकसित अकृषिक भूखंडाच्या किंवा जमिनीच्या मालकाची जबाबदारी.

(अ) विकसित अकृषिक भूखंड किंवा जमिनीमध्ये आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधांसाठी आणि त्यावेळी लागू असलेल्या कायद्यानुसार विकास परवानग्या मिळविणे ;

(ब) वाटप केलेल्या अकृषिक भूखंडाच्या किंवा जमिनीच्या विकासाकरिता आवश्यक असलेल्या इतर त्या सर्व परवानग्या आणि आवश्यक ते " ना-हरकत प्रमाणपत्र " मिळविणे; आणि

(क) विकसित अकृषिक भूखंडावर किंवा जमिनीवर कोणतेही बांधकाम सुरू करण्यापूर्वी विकासविषयक परवानगीच्या मंजुरीसाठी लागू असलेल्या कायद्यानुसार व नियमानुसार आवश्यक ती फी व आकार प्रदान करणे.

**१९स.** (१) महामार्ग प्राधिकरण, विहित रीतीने, योजनेची अंमलबजावणी करील. योजनेची अंमलबजावणी.

(२) महामार्ग प्राधिकरण, अंतिम आराखड्यातील रस्त्यांचे आणि भूखंडाचे किंवा जमिनींचे प्रत्यक्ष सीमांकन करील.

(३) महामार्ग प्राधिकरण, अंतिम आराखड्यानुसार, रस्ते तयार झाल्यानंतर, योजनेनुसार विकसित अकृषिक भूखंडाचा किंवा जमिनीचा कब्जा विहित रीताने, प्रमाणपत्रधारकाच्या स्वाधीन करील.

(४) रस्त्यावरील दिवाबत्ती, घनकचरा व्यवस्थापन, मलजल प्रक्रिया सुविधा, पाणीपुरवठा, उद्याने व खेळाची मैदाने आणि इतर सुखसोयी यांसारख्या उर्वरित पायाभूत सुविधा ह्या महामार्ग प्राधिकरणाकडून टप्प्याटप्प्याने विकसित करण्यात येतील.

**१९ट.** (१) महामार्ग प्राधिकरण, विहित कालावधीच्या आत विहित रीतीने, योजनेच्या समाप्तीची नोटीस प्रसिद्ध करील. योजनेची समाप्ती.

(२) महामार्ग प्राधिकरण, जमीन मालकास किंवा हितसंबंधित व्यक्तींस वाटप केलेल्या विकसित अकृषिक भूखंडाच्या किंवा जमिनीच्या वाटपाचा तपशील देखील, विहित रीतीने प्रसिद्ध करील.

पायाभूत सुविधांचे परिरक्षण.

**१९यू.** (१) विकसित अकृषिक भूखंडाचा किंवा जमिनीचा मालक रस्ते, पथदिवे, घनकचरा व्यवस्थापन, मलजल प्रक्रिया सुविधा, पाणीपुरवठा, उद्याने व खेळाची मैदाने आणि इतर सुखसोई यांसह सामाईक पायाभूत सुविधा आणि तत्सम सेवा पुरविण्यास जबाबदार असलेल्या महामार्ग प्राधिकरणाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणांकडून किंवा अभिकरणांकडून बसविण्यात येणारे उपभोक्ता, वापर व परिरक्षा आकार, प्रदान करील.

(२) महामार्ग प्राधिकरणास, सामाईक पायाभूत सुविधांचे परिरक्षण एकतर स्वतःला करता येईल किंवा ते शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक प्राधिकरणाकडे किंवा अभिकरणाकडे प्राधिकृत करता येईल.

(३) महामार्ग प्राधिकरणास, पायाभूत सुविधांच्या परिरक्षणासाठी विहित करण्यात येईल असा आवश्यक तो उपभोक्ता आकार विहित रीतीने, वसूल करता येईल.

अधिकार सोपविणे.

**१९व्ही.** (१) महामार्ग प्राधिकरणास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, त्यास योग्य वाटतील असे त्याचे अधिकार कोणत्याही अधिकाऱ्याकडे, प्राधिकृत करता येतील आणि ते सोपविता येतील.

(२) महामार्ग प्राधिकरण आणि प्राधिकृत अधिकारी, विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये पार पाडतील.

(३) सक्षम प्राधिकाऱ्यास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, त्यास योग्य वाटतील असे त्याचे अधिकार उप जिल्ह्याधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा अधिकाऱ्याकडे प्राधिकृत करता येतील आणि ते सोपविता येतील.

(४) सक्षम प्राधिकारी आणि प्राधिकृत अधिकारी, विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये पार पाडतील.

योजनेच्या क्षेत्रातील जमिनीच्या विकासावर निर्बंध असणे.

**१९डब्ल्यू.** (१) कलम १९ग च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे योजनेचा उद्देश घोषित केल्यानंतर, कोणताही जमीन मालक किंवा हितसंबंधित व्यक्ती, महामार्ग प्राधिकरणाच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय योजनेच्या क्षेत्रात इमारतीचे बांधकाम, उभारणी, रचना, उत्खनन, इत्यादी कामे करणार नाही.

(२) कलमे ९ ते १३ च्या तरतुदी सदर योजना क्षेत्राला, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ मध्ये कलम ६३अ समाविष्ट करणे.

**७**. मुख्य अधिनियमाच्या कलम ६३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः—

जमिनीचा विनियोग करण्याचा महामार्ग प्राधिकरणाचा अधिकार.

" **६३अ.** महामार्ग प्राधिकरणास त्याच्याकडे निहित असलेल्या जमिनीचा विनियोग, विहित रीतीने, करता येईल. ".

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ७१ ची सुधारणा.

**८**. मुख्य अधिनियमाच्या कलम ७१ मधील पोट-कलम (२) मध्ये,—

(१) खंड (ड-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः—

" (ड-२) कलम १९फ च्या पोट-कलम (४) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडे योजनेचा प्रस्ताव सादर करण्याची रीत;

(ड-३) कलम १९ग च्या पोट-कलम (१) अन्वये योजनेत स्वेच्छेने सहभागी होण्यासाठी हरकती किंवा सूचना तसेच संमती मागविण्याची रीत व कालावधी;

(ड-४) कलम १९ग च्या पोट-कलम (२) अन्वये योजनेत स्वेच्छेने सहभागी होण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे हरकती किंवा सूचना तसेच संमती सादर करण्याची रीत आणि सक्षम प्राधिकाऱ्यासमोर उपस्थित राहण्याचा कालावधी;

(ड-५) कलम १९ग च्या पोट-कलम (४) अन्वये योजनेत समाविष्ट असलेल्या सीमा व क्षेत्र यांचे रेखांकन करणारी अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्याची रीत;

(ड-६) कलम १९ह च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने जमिनीची मालकी आणि संमतीच्या व्याप्तीची पडताळणी करण्याची रीत व कालावधी;

(ड-७) कलम १९आय च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने चौकशी करण्याची रीत;

(ड-८) कलम १९के च्या पोट-कलम (१) अन्वये महामार्ग प्राधिकारणाने प्रारूप आराखडा तयार करण्याची रीत;

(ड-९) कलम १९के च्या पोट-कलम (२) अन्वये महामार्ग प्राधिकारणाने प्रारुप आराखडा प्रसिद्ध करण्याची रीत;

(ड-१०) कलम १९के च्या पोट-कलम (३) अन्वये प्रारूप आराखड्याच्या संबंधातील हरकती किंवा सूचना सादर करण्याची रीत व कालावधी;

(ड-११) कलम १९के च्या पोट-कलम (४) अन्वये महामार्ग प्राधिकारणाने अंतिम आराखडा प्रसिद्ध करण्याची रीत;

(ड-१२) कलम १९म च्या पोट-कलम (२) अन्वये विकसित अकृषिक भूखंडाचे किंवा जमिनीचे वाटप करण्याची रीत;

(ड-१३) कलम १९न च्या पोट-कलम (१) अन्वये जमीन एकत्रीकरण मालकी प्रमाणपत्र निर्गमित करण्याचा कालावधी;

(ड-१४) कलम १९प अन्वये महामार्ग प्राधिकरणाकडे जमिनीचा कब्जा देण्याची रीत;

(ड-१५) कलम १९स च्या पोट-कलम (१) अन्वये महामार्ग प्राधिकरणाने योजनेची अंमलबजावणी करण्याची रीत;

(ड-१६) कलम १९स च्या पोट-कलम (३) अन्वये विकसित अकृषिक भूखंडाचा किंवा जमिनीचा कब्जा, प्रमाणपत्र धारकाकडे देण्याची रीत;

(ड-१७) कलम १९ट च्या पोट-कलम (१) अन्वये महामार्ग प्राधिकरणाने योजना समाप्त झाल्याची नोटीस प्रसिद्ध करण्याची रीत व कालावधी;

(ड-१८) कलम १९ट च्या पोट-कलम (२) अन्वये महामार्ग प्राधिकरणाने विकसित अकृषिक भूखंडाच्या किंवा जमिनीच्या वाटपाचा तपशील प्रसिद्ध करण्याची रीत;

(ड-१९) कलम १९य च्या पोट-कलम (३) अन्वये महामार्ग प्राधिकरणाने वसूल करावयाचा आवश्यक तो वापर आकार आणि असा आकार वसूल करण्याची रीत;

(ड-२०) कलम १९व्ही च्या पोट-कलम (२) अन्वये महामार्ग प्राधिकरणाचे व प्राधिकृत अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये;

(ड-२१) कलम १९व्ही च्या पोट-कलम (४) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याचे व प्राधिकृत अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये;

(ड-२२) कलम ६३क अन्वये महामार्ग प्राधिकरणाने जमिनीचा विनियोग करण्याची रीत; ”.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही कृती करता येईलः

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर या पोट-कलमाखाली असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.